महाराष्ट्र पोलीस

# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ४४७ /पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांकः- २९/०८/२०१८

## " भंडारा पोलीस अधिक्षकांचे जनतेस आवाहन"

भंडारा :- जनतेची दिवसेंदिवस होणारी आर्थिक फसवणुकीच्या गुन्हयात वाढ होत असल्याचे निदर्शनास आल्याने मा. पोलीस अधिक्षक, भंडारा श्रीमती विनीता साहू यांनी जनतेस आपले पैसे गुंतवणुक करातांना खबरदारी घेण्याबाबतचे आवाहन केले आहे.

भंडारा जिल्हात आर्थिक फसवणुकीच्या तसेच वित्तीय घोटाळयांच्या गुन्हयामध्ये वाढ होत असुन जिल्हा पोलीस अभिलेखावर अनमोल, यालको, मैत्री, शेप महाबचत गट, जेएसव्ही, एसजेएसव्ही, सुर्यांशी पोर्टफोलीओ, जागृती ॲग्रो फुडस्, सावित्रीबाई फुले पत संस्था अशा बोगस कंपन्यांनी अक्षरशः जनतेची लाखो रूपयांनी फसवणुक करून लुट केलेली असुन जिल्हयात बॅक घोटाळे, वित्तीय पत संस्था मधिल गैरव्यवहाराचे प्रमाण वाढलेले आहे. जनता सुध्दा कमी कालावधीत दामदुप्पटीच्या आशेने अशा फसवणुक करणाऱ्या कंपन्यामध्ये पदरमोड करून पैसे गुंतवणुक करतात व गोरगरीब जनतेच्या कष्ठाचे पैशाची लुट विविध बोगस कंपन्याद्वारे होत आहे.

तसेच जनतेस त्याचे मोबाईल क्रमांकावर येणारे फोनवर बॅक मधुन बोलतोय असे आशय देवुन त्यांचे खाते क्रमांक, ए.टी.एम. क्रमांक व त्याचा पासवर्ड याविषयाला अनुसरून किंवा मोबाईल क्रमांकावर आलेले बक्षिसे याबाबतची बतावणी करून त्यांचे बॅक खात्यासंबंधी माहिती घेवुन आर्थिक फसवणुक केल्या जात आहे.

जिल्हयात विविध पोलीस स्टेशन ला जनतेकडुन अशा प्रकारची फसवणुक झाली असल्याच्या तक्रारी प्राप्त झाले वरून गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. अशा गुन्हयांचा तपास स्थानिक पोलीस व आर्थिक गुन्हे शाखा, भंडारा करीत आहेत. करीता जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीमती विनीता साहू यांनी जनतेस आवाहन केले आहे की, आर्थिक गुंतवणुक करतांना सावध राहण्याबाबत आवाहन केले आहे.

(जितेंद्र के. आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक,
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ०९४०३१०९७२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनीधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत**, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.